ePaper

**अमित शहांनी शब्द पाळला नाही; उद्धव ठाकरे यांचा पुनरुच्चार**



|वर्ष - 7 । अंक -70 || UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www .mahaenews.com | ।सोमवार, दिनांक 10 जुलै 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

**आतील पानांत**


- जातीयवादी नीलमताई..!
- पुण्यात पोलिसांचा वचक बसण्यासाठी काढली गुंडांची धिंड!
- 'सीएमई' हद्दीतील सांडपाणी प्रकल्पाला


## अजित पवार गटाचे अजित गव्हाणे यांना आमदारकीची 'स्वप्ने'

# जानी दुष्मन दोस्त बने!

### नव्या राजकीय स्थितीमुळे माजी आमदार विलास लांडे यांची राजकीय कोंडी

## महेशदादा म्हणतात म्हैस अजून पाण्यात...

।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राष्ट्रवादीचे नेते अजित पवार यांनी बंडखोरी करत भाजप-शिवसेना सत्तेत सहभागी होण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे स्थानिक राजकीय समिकरणे बदलली असून, अजित पवार गटाचे अजित गव्हाणे यांना आमदारकीची स्वप्ने पडू लागली आहेत. तसेच विद्यमान आमदार महेश लांडगे यांनी म्हैस अजून पाण्यात आहे आणि महापालिकेत भाजपा सत्तेत येईल, असा दावा केला आहे. शहराच्या राजकारणाचा केंद्रबिंदू भोसरी विधानसभा मतदार संघ झाला असून, राजकीय तर्क वितर्कांमध्ये माजी आमदार विलास लांडे यांची कोंडी झालेली दिसत आहे.**



मात्र, त्या न्यायालयीन कचाट्यात सापडल्याने गेले सव्वा वर्षे रखडल्या आहेत. कधी होतील, याविषयी खात्रीही नाही. बदललेल्या राजकीय स्थितीत राष्ट्रवादीसह त्या कशा लढणार असे विचारले "म्हैस अजून पाण्य़ातच तिचा सौदा कसा करणार?", अशी मार्मिक टोलेबाजी भाजपचे पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष आणि भसरीचे भाजप आमदार महेश लांडगे यांनी केली.

दुसरीकडे आपले नेते पुन्हा उपमुख्यमंत्री झाल्याने उद्योगनगरीतील राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांचा उत्साह भलताच दुणावला असल्याचे राज्यातील राजकीय स्थित्यत्यरानंतर दिसून आले आहे. त्यातूनच महापालिकेत पुन्हा सत्तेत येणार असल्याचा दावा पक्षाचे शहराध्यक्ष अजित गव्हाणे यांनी केला.

महापालिकेतील आमच्या १५ वर्षाच्या सत्ताकाळात शहराचा विकास झालेला असल्याचे सांगत शहरवासियांचा अजितदादांच्या नेतृत्वावर विश्वास असल्याने महापालिकेत आमचीच पुन्हा सत्ता येणार असल्याचे त्यांनी सांगितले. त्याचवेळी त्यांनी सव्वावर्ष रखडलेली महापालिका निवडणूक वेळेत होईल की नाही, याविषयी मात्र, शंका व्यक्त केली. त्यापूर्वी लोकसभा निवडणूक अगोदर होण्याची शक्यता त्यांनी वर्तवली. तर, यावर्षी २६ फेब्रुवारीला चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीत लाखभर मते घेतलेले याच पक्षाचे महापालिकेतील माजी विरोधी पक्षनेते नाना काटे यांनी आता २०२४ ची चिंचवडची निवडणुकही लढणार असल्याचा शड्डू ठोकला. त्याचवेळी महापालिका निवडणूक कशी लढवायची याबाबतीत वरिष्ठच निर्णय घेणार असल्याचे गव्हाणे आणि काटे या दोघांनीही स्पष्ट केले.तर, नव्या राजकीय भुंकमामुळे बदललेली राजकीय परिस्थिती आणि महापालिका निवडणुकीची अनिश्चितता यावर आमदार लांडगे यांनी नेमकी व मार्मिक टिपण्णी केली. या निवडणुकीचे अजून कशातच काही नसून म्हैस ही सध्या पाण्यात (महापालिका निवडणूक ही न्यायालयाच्या फेऱ्यात असून ती होईल की नाही म्हणजे ही म्हैस पाण्याबाहेर येईल की नाही हे नक्की नसताना) असताना तिचा सौदा कसा करणार (म्हणजे महापालिका निवडणूक कशी लढणार, म्हणजे राष्ट्रवादीला घेऊन लढणार की कसे) अशी उलट विचारणा त्यांनी केली.



## राष्ट्रवादीलाही बरोबर घेत लढावी लागणार निवडणूक

**पिंपरी-चिंचवड महापालिकेत गेल्या सव्वा वर्षापासून प्रशासकीय राजवट आहे. गतवेळी २०१७ ला सलग १५ वर्षे सत्तेत असलेल्या राष्ट्रवादीचा पराभव करून भाजप प्रथमच महापालिकेत सत्तेत आली. २०२२ च्या निवडणुकीसाठी त्यांनी `अब की बार सौ पार` ची घोषणा करीत पुन्हा सत्तेत येऊ, असा निर्धार केला होता.**

**मात्र, त्याला या नव्या समीकरणामुळे छेद बसला आहे. नवा भिडू मिळाल्याने भाजपला आता महापालिका निवडणूक ही शिवसेनाच (शिंदे) नाही, तर राष्ट्रवादीलाही बरोबर घेत लढावी लागणार आहे.**

## वैचारिक मतभिन्नतेतून पुरोगामी विचारांच्या पवारसाहेबांसोबत

*पिंपरी-चिंचवडमधील बहूतांश राष्ट्रवादी ही अजितदादांच्या पाठीशी राहिली. त्याला अपवाद पक्षाचे प्रदेशवरील दोन पिंपरी-चिंचवडकर पदाधिकारी ठरले. त्यांनी आपण साहेबांसोबत असल्याचे `सरकारनामा`ला आज सांगितले. सुनील गव्हाणे आणि रविकांत वर्पे हे ते दोन अपवाद ठरलेले पदाधिकारी आहेत. गव्हाणे हे राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे प्रदेश अध्यक्ष, तर वर्पे हे प्रदेश प्रवक्ते आहेत. वर्पे अगोदर राष्ट्रवादी युवकचे प्रदेश कार्याध्यक्षही होते. पवारसाहेबांबाबत आदर व्यक्त करीत राष्ट्रवादीचे पिंपरी-चिंचवड शहर जिल्हा अध्यक्ष अजित गव्हाणे हे आपल्या संपूर्ण कार्यकारिणीसह अजितदादांसोबत गेले आहेत.*

*मात्र, त्याला अपवाद प्रदेश पातळीवर काम करणारे सुनील गव्हाणे व वर्पे हे दोन पिंपरी-चिंचवडकर ठरले आहेत. वैचारिक मतभिन्नतेतून आपण ही वाट निवडल्याचे त्यांनी सांगितले. प्रतिगामी विचारांच्या भाजपसोबत जाऊ शकत नाही, असे सांगत पुरोगामी विचारांच्या पवारसाहेबांसोबत राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. या दोघांनीही पक्ष फुटीनंतरच्या कालच्या येवला (जि.नाशिक) येथील पवारसाहेबांच्या पहिल्या जाहीर सभेला हजेरीही लावली. त्यांच्यासारखीच प्रतिक्रिया राष्ट्रवादीशी संलग्न कष्टकरी संघर्ष महासंघाचे अध्यक्ष पिंपरी-चिंचवडकर काशीनाथ नखाते यांनीही दिली. संभाजी ब्रिगेडमधून अजितदादांनी मला राष्ट्रवादीत म्हणजे राजकारणात आणलं, संधी दिली. पण, आरएसएसच्या ज्या विचारधारेशी आतापर्यंत लढलो, त्यांच्याबरोबर म्हणजे भाजपबरोबर कसा जाणार? अशी नेमकी विचारणा वर्पे यांनी केली.*

# मनसेकडून ‘एक सही संतापाची’!

## » कोणत्याही नेत्यामध्ये पक्षनिष्ठा दिसत नाही, पुणेकरांचे मत

### » पुणे शहर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष साईनाथ बाबर यांच्या नेतृत्वाखाली मोहिम

। पुणे/ लोणावळा । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते अजित पवार यांनी सहा दिवसांपूर्वी शिंदे फडणवीस यांच्यासोबत जाऊन सरकारला पाठिंबा दर्शविला. उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. त्या घटनेनंतर शरद पवार आणि अजित पवार यांच्यात आरोप प्रत्यारोप पाहण्यास मिळत आहे. त्या राजकीय घडामोडीनंतर सर्वसामान्य नागरिकांमधून संतप्त प्रतिक्रिया समोर येत असून, त्याचदरम्यान पुणे शहर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष साईनाथ बाबर यांच्या नेतृत्वाखाली शहरात एक सही संतापाची मोहीम हाती घेण्यात आली.**




कसबा विधानसभा मतदारसंघातील शनिपार चौकात घेण्यात आलेल्या एक सही संतापाच्या मोहिमेस नागरिकांचा प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. कोणत्याही पक्षातील नेत्यांमध्ये पक्षनिष्ठा दिसून येत नाही, अशा शब्दात पुणेकर नागरिकांनी राजकीय नेत्यांना सुनावले. विनोद भट म्हणाले की, मागील काही महिन्यांत देशात आणि राज्यात चुकीच्या पद्धतीने राजकारण सुरू आहे. आपण आज एकाला मतदान केले, पण चार वर्षांत कोण कोणासोबत गेले हे समजत नसून या राजकीय लोकांनी लोकशाहीची थट्टा केल्याचे यातून दिसत आहे. हे पाहून आम्हाला खूप वाईट वाटत आहे. एकमेकांवर खालच्या स्तरावर आरोप प्रत्यारोप करायचे आणि काही तासांत सत्तेसाठी त्यांच्याकडे जायचे. या सर्व घडामोडी पाहिल्यावर कोणत्याही पक्षातील नेत्यामध्ये पक्षनिष्ठा दिसून येत नाही, असा प्रश्नदेखील त्यांनी उपस्थित केला. तसेच ते पुढे म्हणाले की, शिंदे आणि फडणवीस यांच्यासोबत जाऊन अजित पवार उपमुख्यमंत्रीपदावर विराजमान झाले. त्यानंतर अजित पवार यांनी शरद पवार यांच्यावर अनेक आरोप प्रत्यारोप केले. पण एक गोष्ट नाकारता येत नाही. ती म्हणजे अजित पवार यांच्यासह सर्व नेत्यांना पडत्या काळात शरद पवार यांनी साथ दिली.

### चुकीच्या पद्धतीने राजकारण सुरू : शशिकला गुरव

सध्या अंत्यत चुकीच्या पद्धतीने राजकारण सुरू असून सर्व सामान्य नागरिकांच्या प्रश्नाकडे लक्ष नाही. आजपर्यंत वाद घातले आणि आता एकत्र आले आहे. हे सर्व नागरिकांनी लक्षात ठेवले पाहिजे. आपण नेत्यांच्या मागे जातो आणि ते नंतर एकत्रित येतात. आपल्यामध्ये कायमचा वाईटपणा येतो. या राजकीय घडामोडीमधून आता तरी शिकले पाहिजे, अशी फळ विक्रेत्या शशिकला गुरव यांनी मांडली. मी आतपर्यंत दोन वेळेस मतदान केले आहे. पण सध्याची राजकीय घडामोड लक्षात घेता या पुढील काळात होणाऱ्या निवडणुकीत मतदान करायचे की नाही, तसेच लोकशाही जिवंत आहे की नाही, हादेखील प्रश्न निर्माण झाला. त्याचबरोबर सद्य:स्थितीला कार्यकर्त्यांना तुम्ही कोणत्या पक्षाचे कार्यकर्ते आहात विचारल्यावर तेदेखील सांगू शकत नाही, असा प्रश्न अनेक तरुणांनी यावेळी उपस्थित केला.

---

# पवारसाहेबांना की अजितदादांना पाठिंबा?

## » जुन्नरचे आमदार अतुल बेनके यांची टोकाची भूमिका; दोघांचेही टेन्शन वाढवलं

। जुन्नर, पुणे। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**अजित पवारांच्या बंडानंतर त्यांच्या बाजूला राष्ट्रवादीतील किती आमदार आहे आणि शरद पवारांच्या बाजूने किती? हे अद्यापही स्पष्ट होऊ शकलेलं नाही. कारण राष्ट्रवादीतील अनेक आमदारांचे अजूनही तळ्यात मळ्यात सुरू आहे. शरद पवार की अजितदादा असा पेच त्यांच्यासमोर आहे. आता जुन्नरचे आमदार अतुल बेनके यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे.**



अजित पवार यांच्या बंडाने राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर पक्षाच्या आमदारांमध्ये मोठी अस्वस्थता आणि संभ्रम आहे. अनेक जण मोठ्या राजकीय पेचात अडकले आहेत. शरद पवार आणि अजित पवार या दोन्ही नेत्यांबद्दल प्रेम असल्याने कुणाच्या बाजूने जावे? हे समजत नसल्याने त्यांची मोठी अडचण झाली आहे. मात्र यात जुन्नरचे आमदार अतुल बेनके यांनी आपली भूमिका जाहीर केली आहे.

नारायणगाव येथे त्यांनी आज पत्रकार परिषद घेत आपली भूमिका स्पष्ट केली. बंडानंतर काही दिवसांनंतर त्यांनी आपली भूमिका जाहीर केली आहे. अशा राजकीय वातावरणात आपली भूमिका तटस्थ आहे. पुढेही तटस्थ राहील. आपल्या आमदारकीचा कार्यकाळ पूर्ण करेल. तसेच आगामी विधानसभा निवडणूक लढवण्याची मानसिकता नाही, असे त्यांनी स्पष्ट केले आहे.

बेनके आणि पवार कुटुंबात ४५ वर्षांहून अधिक जुने संबंध आहेत. माझे वडील वल्लभ बेनके यांनी शरद पवार यांची साथ कधी सोडली नाही. शरद पवार हे माझे दैवत म्हणून तर उपमुख्यमंत्री अजित पवार यांना नेते म्हणून स्थान आहे. या दोघांनाही मी बाजूला करू शकत नाही. त्यामुळे मी तटस्थ राहण्याचा निर्णय घेतला आहे, असे यावेळी अतुल बेनके म्हणाले. सध्याची परिस्थिती पाहता विधानसभेची २०२४ ची निवडणूक न लढविण्याची आपली मानसिकता झाली असल्याचे देखील बेनके यांनी सांगितले. माझ्या मतदारसंघासाठी मला अजित पवार आणि दिलीप वळसे पाटील यांची साथ मिळाली. तसेच तालुक्यातील बिबट सफारी डीपीआर, पिंपळगाव जोगे कालवा, किल्ले शिवनेरी विकास परिसर, रस्ते, बिबट निवारा केंद्र आणि बंधाऱ्यांची कामे अजित पवारांमुळे मार्गी लागली असल्याचे त्यांनी सांगितले. अजित पवार यांच्या बंडामुळे अतुल बेनके काय भूमिका घेणार? याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. आपल्याला डेंग्यू झाल्याने आपण उपचार घेत होतो, असे सांगत त्यांनी बरे झाल्यावर कार्यकर्त्यांशी बैठक घेतली. त्यांनी पत्रकार परिषदेत आपली भूमिका स्पष्ट केली. जुन्नर तालुक्याच्या विकासासाठी जनतेने मला निवडून दिले आहे.

### साहेबांची साथ सोडताना मोठा पेच

**»,अजित पवार यांच्या नेतृत्वात राष्ट्रवादीच्या अनेक ज्येष्ठ नेत्यांनी पक्षाध्यक्ष शरद पवार यांच्याविरोधात बंड करत राज्य सरकारमध्ये सामील होण्याचा निर्णय घेतला. राष्ट्रवादीतील या बंडामध्ये सर्वाधिक चर्चा झाली ती पुणे जिल्ह्यातील एका नेत्याची आणि त्या नेत्याचं नाव म्हणजे आंबेगावचे आमदार आणि नवनिर्वाचित कॅबिनेट मंत्री दिलीप वळसे पाटील. शरद पवार यांचे अत्यंत विश्वासू मानले जाणारे वळसे पाटील हे बंडखोरांच्या गटात गेल्याने सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला. मात्र ईडी कारवाईच्या धोक्यामुळे वळसे पाटलांनी हे पाऊल उचलल्याचा आरोप त्यांच्यावर होत आहे. या पार्श्वभूमीवर त्यांनी आज आपल्या मतदारसंघात कार्यकर्त्यांचा मेळावा घेत भूमिका स्पष्ट केली आणि आपल्यावर होत असलेल्या आरोपांनाही जोरदार प्रत्युत्तर दिलं आहे. 'ईडीमुळे मी पवारसाहेबांची साथ सोडली नाही. मी जाहीर करतो की मला ईडी, सीबीआय किंवा इन्कम टॅक्सची कसलीही नोटीस आलेली नाही. काहीही वैयक्तिक हित माझ्या निर्णयामागे नाही. एका विद्वानाने सांगितलं की, पराग आणि गोवर्धन डेअरीला नोटीस आली म्हणून मी असं केलं. मात्र माझा आणि या डेअरीचा काडीचाही संबंध नाही. आमच्या कुटुंबातील एकाही व्यक्तीची या डेअरीमध्ये एक रुपयीही गुंतवणूक नाही,' असं स्पष्टीकरण दिलीप वळसे पाटील यांनी कार्यकर्त्यांसमोर दिलं आहे.**

# वर्षाविहार जीवावर बेतला!

## मुंबईतून तरुण-तरुणी लोणावळ्यात फिरायला गेले, पण तरुणीसह दोघे बुडाले

**दोन तरुणांचा दगडाच्या खाणीत बुडून मृत्यू**

**एका तरुणीचा जीव थोडक्यात वाचला**

। पुणे/ लोणावळा । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**लोणावळ्यात वर्षाविहारासाठी चार मित्र मैत्रिणींसोबत आलेल्या मुंबईतील दोन तरुणांचा लोणावळ्याजवळील वरसोली गावच्या हद्दीतील एका दगडाच्या खाणीतील पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्याने बुडून मृत्यू झाला आहे. तर बुडणाऱ्या एका तरुणीला त्यांच्या मित्रांनी स्थानिकांच्या मदतीने वाचविले. ही घटना शनिवारी सायंकाळी ७ वाजताच्या सुमारास घडली घडली.**



प्रियांक पानचंद व्होरा (वय-३५, रा. पवई, मुंबई), विजय सुभाष यादव (वय -३५, रा. घाटकोपर, मुंबई) असे दगडाच्या खाणीत बुडून मृत्यू झालेल्या तरुणांची नावे आहेत. तर झेनिया वियागत (वय -२९, रा. मुलूंड, ठाणे) या तरुणीला तिचे मित्र व स्थानिकांना वाचवले आहे. लोणावळा ग्रामीण पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार प्रियांक, विजय आणि झेनिया या तिघांसह सहा मित्र, यामध्ये दोन तरुणी शनिवारी दुपारनंतर लोणावळ्यात वर्षाविहाराला आले होते. त्यांनी वरसोली येथे एक बंगला भाड्याने घेतला होता. सायंकाळी ते सर्वजण बंगल्याच्या मागील बाजूस असलेल्या डोंगराच्या पायथ्या जवळील एका दगडाच्या खाणीकडे फिरायला गेले होते. यावेळी ते दगडाच्या खाणीतील पाण्यात पोहण्यासाठी उतरले असता, त्यांना खाणीतील पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्यामुळे दोघांचा जागीच बुडून मृत्यू झाला तर एका तरुणीला त्यांच्या मित्रांनी स्थानिकांच्या मदतीने वाचविले. हे सर्व मित्र-मैत्रिणी हे मुंबईतील एका फायनान्स कंपनीत कामाला आहेत. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच लोणावळा ग्रामीण पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत घटनेची पाहणी करत बुडालेल्या दोघांना त्यांच्या मित्र व स्थानिकांच्या मदतीने पाण्यातून बाहेर काढले. त्यानंतर त्यांना नजिकच्या हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल केले असता, डॉक्टरांनी त्यांचा यापूर्वीच मृत्यू झाल्याचे सांगितले. या घटनेची फिर्याद त्यांचा मित्र अभिजीत सावंत यांने लोणावळा ग्रामीण पोलीस ठाण्यात दिली असून, या घटनेचा पुढील तपास लोणावळा ग्रामीणचे पोलीस किशोर पवार हे करीत आहेत.

---

# आयटी कंपनीतील नोकरीचे बनावट नियुक्तीपत्र देवून ७० जणांची फसवणूक करणारी टोळी अटकेत!

## फिर्यादीसह 60 ते 70 मुला-मुलींकडून गुगल, फोनपेद्वारे 50 लाख रुपये उकळले

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आयटी कंपनीत नोकरी लावण्याचे आमिष दाखवत बनावट नियुक्तीपत्र देवून ७० मुला-मुलींची ५० लाखांची फसवणूक करणाऱ्या टोळीला गुन्हे शाखा युनिट चारच्या पथकाने अटक केली.**

महेशकुमार हरिचंद्र कोळी ( वय ३२, रा. सोमवार पेठ, पुणे), अनुदिप चंद्रकांत पशुपती ऊर्फ शर्मा ( वय ५२, रा. कानदेवनगर, वाघोली), कल्पना मारुतराव बखाल ( वय ३० रा. दत्तनगर, दिघी) आणि श्रावण एकनाथ शिंदे ( वय ३२, रा.तुकारामनगर वाघोली) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. याबाबत कमलेश पंढरीनाथ गंगावणे (वय ४०, रा.काळेवाडी) यांनी फिर्याद दिली आहे. टेक्नॉलॉजी एस ए पी, एम एम कंपनी आणि एम के मॅनेजमेंट सर्व्हिसेस नावाने नोकरीची जाहिरात देणारा कंपनीचा मालक कोळी आणि आरोपींनी फिर्यादी गंगावणे आणि त्यांच्या सहकाऱ्यांना आरोपी पशुपती याच्या खराडीतील आयटी कंपनीत नोकरी लावण्याचे आमिष दाखविले. अस्तित्वात नसलेल्या कंपनीचे नेमणूक पत्र दिले. फिर्यादीसह ६० ते ७० मुला-मुलींकडून गुगल, फोनपेद्वारे ५० लाख रुपये उकळले आहेत.

### साडेचार लाखांची अफू जप्त

राजस्थानातून अफू विक्रीसाठी आलेल्या तरुणाला अमली पदार्थ विरोधी पथकाने बिबवेवाडी भागात पकडले. त्याच्याकडून चार लाख ६० हजार रुपयांची २३० ग्रॅम अफू, मोबाइल संच, दुचाकी असा मुद्देमाल जप्त करण्यात आला. लाडूराम वागाराम बिष्णोई (वय २०, रा. सरनाऊ, जि. जालोर, राजस्थान) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे.





## भूमिका

# भुजबळ यांची डोकेदुखी वाढली!

**मशिवसेना सोडल्यापासून पुन्हा राजकीय पुनर्वसन करण्यासह प्रत्येक संकटात छगन भुजबळ यांना साथ देणारे शरद पवार यांना आधाराची गरज असताना भुजबळ यांनी त्यांना दूर लोटावयास नको होते, ही भावना येवला येथील जाहीर सभेस उपस्थित असणाऱ्या जवळपास प्रत्येकाची होती. ग्रामीण भाग आणि शेतकरीवर्ग हा प्रथमपासूनच राजकारणाचा पाया राहिलेल्या शरद पवार यांच्या लोकप्रियतेत राष्ट्रवादीतील बंडामुळे निर्माण झालेल्या सहानुभूतीची भर पडली आहे.**

भविष्यातील राजकारणात केवळ भुजबळच नव्हे तर, इतर सर्व बंडखोरांसाठी हीच मोठी डोकेदुखी ठरणार असल्याचा संदेश आयोजकांच्या अपेक्षेपेक्षा अधिक प्रतिसाद मिळालेल्या या सभेने दिला आहे.

राष्ट्रवादीत अजित पवार यांनी सवतासुभा मांडून शिंदे-फडणवीस सरकारमध्ये उपमुख्यमंत्री होण्यात धन्यता मानली. अजितदादा यांना प्रफुल पटेल, छगन भुजबळ, दिलीप वळसे पाटील यांसारख्या ज्येष्ठ मंडळींनी साथ दिल्याने शरद पवार यांना हा मोठा धक्का मानला गेला. या सर्व ज्येष्ठ मंडळींनी शरद पवार यांच्या वयाचा उल्लेख करून त्यांना आता थांबण्याचा सल्लाही दिला. नेमकी हीच बाब जिव्हारी लागलेले शरद पवार यांनी पुन्हा एकदा महाराष्ट्र पिंजून काढत राष्ट्रवादीची उभारणी करण्याचा निर्णय जाहीर केला. चाणाक्ष पवार यांनी पहिल्या जाहीर सभेसाठी कायमच त्यांच्या पाठीशी उभ्या राहणाऱ्या नाशिक जिल्ह्यातील येवला या भुजबळ यांच्या मतदारसंघाची निवड केली.



शिवसेनेतून बाहेर पडलेल्या भुजबळ यांचा माझगाव या त्यांच्या मतदारसंघात पराभव झाल्यानंतर ॲड. माणिकराव शिंदे यांच्यासह इतर राजकीय मंडळींच्या मागणीनुसार आणि सुरक्षित म्हणून येवला मतदारसंघात पवार यांनी भुजबळ यांचे बस्तान बसविले. त्यासाठी सलग दोन वेळा निवडून आलेले जनार्दन पाटील, मारोतराव पवार यासारख्या माजी आमदारांना नाराजही केले. भुजबळ यांनी अंगभूत कौशल्याने त्यानंतर सर्व विरोधकांना आपल्या जाळ्यात ओढून सलग चार वेळा येवल्याचे प्रतिनिधित्व केले. भुजबळ यांच्या कार्यशैलीविषयी नंतर पवार यांच्याकडे काही तक्रारी गेल्या तरी त्यांच्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. इतका विश्वास थोरल्या साहेबांनी भुजबळ यांच्यावर टाकला होता. त्यामुळे भुजबळांविषयी नाराजी असूनही ज्येष्ठ मंडळींना गप्प राहण्याशिवाय पर्यायही उरला नव्हता. राष्ट्रवादीतील बंडानंतर आणि भुजबळ यांनी पवार यांची साथ सोडल्यामुळे या सर्व नाराजवंतांना एकत्र येण्याची संधी आयतीच चालून आली. त्यामुळे येवल्याच्या राजकीय व्यासपीठावर प्रथमच पवार यांच्या सभेच्या निमित्ताने जिल्हा बँकेचे माजी उपाध्यक्ष ॲड. माणिकराव शिंदे, जनार्दन पाटील, मारोतराव पवार, कल्याणराव पाटील, अंबादास बनकर या माजी आमदारांसह ठाकरे गटाचे विधान परिषदेतील आमदार नरेंद्र दराडे अशी मंडळी एकत्र आली. एकत्रित राहिल्यास येवला मतदारसंघाचे राजकारण पूर्णपणे बदलून टाकण्याची ताकद या मंडळींमध्ये आहे. शरद पवार यांनी साद दिली आणि एकमेकांमधील सर्व मतभेद विसरून ही मंडळी दोन दिवसांत सभा यशस्वी करण्यासाठी एकत्र आली. त्यात काँग्रेस, ठाकरे गटानेही भक्कम साथ दिली. येवल्यात अल्पसंख्यांकांचे प्रमाणही बऱ्यापैकी असून त्यांचीही उपस्थिती सभेला होती.

नाशिक जिल्ह्याने शरद पवार यांना कायमच साथ दिलेली असल्याने आणि जिल्ह्यातील कांदा या जिव्हाळ्याच्या विषयावर शहरी भागातील ग्राहकांपेक्षा शेतकरी हित जपण्यास पवार यांनी सतत प्राधान्य दिलेले असल्याने आजही त्यांच्याविषयीचा जिव्हाळा शेतकऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर आहे. ग्रामीण भागातील राजकारणाची नाडी चांगलीच ओळखून असलेल्या पवार यांच्यावरील हा जिव्हाळाच राष्ट्रवादीतील बंडात त्यांना आधार देणारा ठरणार असल्याचे येवल्यातील सभा सांगून गेली. सभेसाठी उपस्थितांमध्ये शेतकऱ्यांचे प्रमाण लक्षणीय होते. त्यात जसे ज्येष्ठ होते, तसेच तरुणही होते. गंमत म्हणजे, पवार यांचा आपल्या वयाचा उल्लेख करू नये, अ्सा आग्रह असतानाही सभेसाठी ठिकठिकाणी लागलेल्या सर्व फलकांवरील ८३ वर्षांचा योद्धा ही नोंद लक्ष वेधून घेत होती. बंडखोरी करणाऱ्यांविरोधात असंतोष निर्माण करण्यात ही नोंदही महत्वपूर्ण ठरली. जमलेल्या गर्दीतून उमटणारी भावना हेच दर्शवित होती.

मुद्देसूद आणि संयत मांडणी करीत पवार यांनी भाषणामध्ये भुजबळ यांची निवड करण्यात आपली चूक झाल्याचे सांगितल्यावर टाळ्यांचा आणि घोषणांचा झालेला वर्षाव बरेच काही सांगून जाणारा होता. विशेष म्हणजे, २०१९ च्या लोकसभा निवडणुकीवेळी साताऱ्यात भर पावसात झालेल्या सभेतही पवार यांनी उदयनराजेंना लक्ष्य करताना आपली निवड चुकली हे नमूद केले होते. हा अपवाद वगळता पवार यांनी भ्रष्टाचाराच्या मुद्यावरून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आरोपांचा उल्लेख करीत, केंद्रातील सर्वशक्ती वापरून या आरोपांची चौकशी करावी आणि आरोप सिद्ध होणाऱ्यांना शिक्षा करावी, असे आव्हान दिले. शिंदे-फडणवीस सरकारमध्ये मंत्री झालेल्या राष्ट्रवादीतील अनेकांवर याआधी भाजपकडूनच भ्रष्टाचाराचे आरोप झालेले असल्याने (भुजबळ तर तुरुंगातही होते) हे आव्हान देण्यामागील राजकीय चातुर्य लक्षात येईल. सभा झाल्यानंतर सुप्रिया सुळे, अमोल कोल्हे यांच्या वाहनांभोवती पडलेला लोकांचा गराडा पवार यांच्यासमवेत असलेल्या नवीन पिढीच्या नेत्यांसाठीही उत्साहवर्धक म्हणावा लागेल.

## संपादकीय »

### स्पर्धेतील सहकार्य!

***चीनला नमवण्यासाठी अमेरिकेचे प्रयत्न ठीकच; पण उभय देशांतील आर्थिक संबंधांचा आकार पाहता चिनी आडमुठेपणास रोखण्याची अपेक्षाच अमेरिकेकडून केली जाऊ शकते...***

भारताबरोबर लोकशाहीचे द्वंद्वगीत गाण्याआधी अमेरिकेचे सेक्रेटरी ऑफ स्टेट (परराष्ट्रमंत्री) अँथनी ब्लिंकेन हे चीन दौऱ्यावर होते आणि या द्वंद्वगीत गायनानंतर अमेरिकेच्या ट्रेझरी सेक्रेटरी (अर्थमंत्री) जॅनेट येलेन या चीनमध्ये आहेत. भारतीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अमेरिका दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर अध्यक्ष बायडेन यांनी चीनचे अध्यक्ष जिनपिंग यांच्यावर तोंडसुख घेतले. त्यानंतर अवघ्या काही आठवड्यांत येलेन यांचा चीन दौरा सुरू झाला. पुढील काही दिवसांत अध्यक्ष जो बायडेन यांचे विशेष दूत जॉन केरी हे चीनला भेट देतील आणि या आठवड्यात मंगळवारी अध्यक्ष बायडेन हे लंडनमध्ये पर्यावरण संवर्धन निधी सभेत सहभागी होतील. तेथील विषय पर्यावरण रक्षणार्थ विकसित देशांनी कशी आणि किती मदत द्यावी हा असेल. येलेन यांनीही बीजिंग दौऱ्यात चीनने या उदात्त कार्यासाठी हात सैल करावा अशी विनंती केली.

**एकीकडे मंत्रिमंडळात अनेक निर्णय होत असताना उद्योग खात्याच्या मंत्रिमंडळ उपसमितीनेही ४० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणाऱ्या प्रकल्पांच्या उभारणीला मान्यता दिली आहे. महाराष्ट्रातील भाजप-शिवसेना आघाडीच्या सरकारने बुधवारी महत्त्वाच्या अनेक निर्णयांची माळ लावली असून ते तसेच्या तसे आणि वेगाने अमलात आले तर राज्यातील मोठ्या वर्गाला त्यांचा लाभ होईल.**

# द्विपक्षीय राजकारणाकडे..!

अजित पवार यांच्या बंडामुळे राज्यातील सारीच राजकीय समीकरणे बदलली आहेत असे असताना, अजित पवार हे मुख्यमंत्री होतील, असे भाकीत व्यक्त करून माजी मुख्यमंत्री व काँग्रेस नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी राजकीय वर्तुळात खळबळ उडवून दिली. एकनाथ शिंदे यांची उपयुक्तता आता कमी झाली असल्याने भाजप शिंदे यांच्याऐवजी अजित पवार यांना मुख्यमंत्रीपदाची संधी देऊ शकतो. वर्षभराच्या अंतरात शिवसेना आणि राष्ट्रवादीत झालेल्या बंडामुळे राज्याचे राजकीय चित्र बदलू लागले आहे. राज्यात यापुढील काळात काँग्रेस आणि भाजप अशा दोन पक्षांनाच थारा मिळेल, असा दावाही चव्हाण यांनी 'लोकसत्ता लोकसंवाद' या कार्यक्रमात केला. त्यांच्याशी झालेल्या संवादाचा संपादित सारांश.



राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडणार होती, हे स्पष्ट होते. अंतर्गत वाद सुरू होते, सत्तासंघर्ष सुरू होता. शरद पवार यांनी तडकाफडकी अध्यक्षपदाचा राजीनामा दिला, त्यानंतर जे काही नाट्य घडले त्या वेळी अजित पवार पक्ष सोडून जात आहेत, असे त्यांना वाटत होते. मग सुप्रिया सुळे यांच्याकडे जबाबदारी दिली तर काय होऊ शकते याची चाचपणी केली. मात्र अजित पवार सोडून जात नाहीत, असे जेव्हा कळले तेव्हा ते मागे आले. सुप्रिया सुळे यांच्याकडे कार्याध्यक्षपद सोपविण्याचे नवे सूत्र आणले. हा संघर्ष सुरू होता, त्याच वेळी अजित पवार यांच्या थेट अमित शहांबरोबर बैठका सुरू होत्या. मध्यस्थी प्रफुल पटेल करीत होते.

अजित पवार यांचे पहिल्यापासून म्हणणे होते की मला मुख्यमंत्री करा. पण ही कटू गोळी घ्यायची का, अजित पवार यांना स्वीकारायचे का, असा प्रश्न होता. रा. स्व. संघ व नितीन गडकरी गटाचा त्याला विरोध होता व आहे. अजित पवारांना मुख्यमंत्री करायचे की नाही हा वाद अजून सुरू आहे. माझी माहिती आहे व दिल्लीतही तशी कुणकुण आहे, की १० ऑगस्टच्या आधी विधानसभा अध्यक्षांना एकनाथ शिंदेंच्या प्रकरणाचा निकाल द्यावा लागेल. शिवसेना ठाकरे गटाचे सुनील प्रभू न्यायालयातही गेले आहेत. १० ऑगस्ट यासाठी की सर्वोच्च न्यायालयाने अध्यक्षांकडे प्रकरण सोपविले, त्यानंतर ११ मे रोजी निकाल दिला, त्याला तीन महिने होत आहेत. ९० दिवसांत निकाल दिला पाहिजे असा निर्णय एका प्रकरणात न्यायालयाने दिला आहे. अजित पवारांना काहीही करून पद हवे होते. शरद पवार यांना अजित पवारांकडे विरोधी पक्षनेतेपद सोपवायचे नव्हते. जयंत पाटील यांच्याकडे हे पद सोपविण्याची त्यांची योजना होती. पण अजित पवार विरोधी पक्षनेते झाले.

## || अभंगवाणी ||



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# कोकण आणि गोव्यात मुसळधार!

## » मुंबई शहर, पालघर जिल्ह्यात सरासरीपेक्षा जास्त पावसाची नोंद

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राज्यात पुढील दोन दिवसांत पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. कोकण आणि गोव्यात मुसळधार, तर मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातही पावसाचा अंदाज असून, यंदाच्या मोसमात आतापर्यंत मुंबई शहर, पालघर जिल्ह्यात सरासरीपेक्षा जास्त पावसाची नोंद झाली आहे.**



यंदा प्रशांत महासागरात एल निनो स्थिती निर्माण झाल्याने त्याचा पावसावर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे मोसमी पाऊस दाखल झाल्यानंतरही पावसाला जोर असल्याचे दिसून आलेले नाही.

सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, नाशिक, धुळे, नंदूरबार, लातूर, गोंदिया, भंडारा या जिल्ह्यांमध्ये सर्वसाधारण पाऊस पडला आहे, तर उर्वरित बहुतांश जिल्ह्यांमध्ये सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला आहे. दरम्यान, दक्षिण गुजरात किनारपट्टी ते उत्तर केरळ किनारपट्टीपर्यंत असलेला कमी दाबाचा पट्टा कायम असल्याची माहिती हवामान विभागाने दिली. गेल्या चोवीस तासांत कोकणातील कणकवली येथे ५.२, मध्य महाराष्ट्रातील गगनबावडा येथे ७.६ मिमी, इगतपुरी येथे ६.२, महाबळेश्वर येथे ४.७, मराठवाड्यातील बिलोली येथे ३, उदगीर येथे १.८, विदर्भातील धामणगाव येथे ५, बल्लारपूर येथे ५ मिलिमीटर पावसाची नोंद झाली.

मुंबईत यंदा मान्सून उशिरा दाखल झाला असला, तरी पंधरा दिवसांत झालेल्या मुसळधार पावसाने संपूर्ण महानगर भिजले आहे. शहरात (विशेषत: दक्षिण मुंबई आणि आसपास) मर्यादित पावसाची नोंद झाली असली तरी जुलैच्या पहिल्या आठवड्यात उपनगरांमध्ये जोरदार पाऊस झाला. येत्या काही दिवसांतही मान्सूनचा हा ट्रेंड कायम राहणार असून, मुंबईकरांना चांगला पाऊस पडेल, असे हवामान खात्याचा अंदाज आहे. हवामान तज्ज्ञांच्या मते, मान्सून साधारणत: १० ते ११ जून दरम्यान मुंबईत दाखल होतो, पण यावेळी तो दोन आठवडे उशिराने आला आहे. मात्र, असे असतानाही पावसाने येथे कोणतीही कसर सोडली नाही. 24 जूनपासून सुरू झालेल्या पावसाने 30 जूनपर्यंत मुंबईकरांना भिजवले.

हवामान खात्याच्या आकडेवारीवर नजर टाकल्यास जूनअखेर उपनगरात ५४९ मिमी पावसाची नोंद झाली असून, तो सरासरीपेक्षा २ टक्के अधिक आहे. त्याच वेळी, शहरात साधारणपणे जूनमध्ये 542.3 मिमी पाऊस पडला पाहिजे, परंतु जून अखेरपर्यंत 424.8 मिमी (सामान्यपेक्षा 21.7 टक्के कमी) पाऊस झाला.

मुंबई शहर आणि उपनगरात मान्सूनच्या पावसाने चांगली हजेरी लावली आहे. येत्या काही दिवसांतही ते कायम राहण्याची अपेक्षा आहे. मात्र, मधूनमधून पडणारा मुसळधार पाऊस आता कमी होईल आणि 12 जुलैपर्यंत हलका पाऊस सुरू राहील.

जूनच्या शेवटच्या आठवड्यात मान्सून मुंबईत दाखल झाला. तेव्हापासून सतत पाऊस पडत आहे. मध्यंतरी थोडा पाऊस झाला असला तरी गुजरातजवळ ५ जुलैपासून पुन्हा एकदा चक्रीवादळ निर्माण झाले आहे. त्यामुळे पुन्हा एकदा महानगरात चांगलाच पाऊस पडत आहे.

### जुलैमध्ये मुंबई ओली होईल

» जुलैमध्येही पावसाने मुंबईकरांची कृपादृष्टी ठेवल्याचे हवामान खात्याने म्हटले आहे. 1 ते 8 जुलै रोजी सकाळी 8.30 वाजेपर्यंत उपनगरात सुमारे 482 मिमी पावसाची नोंद झाली, तर याच काळात शहरात सुमारे 226 मिमी पावसाची नोंद झाली. IMD नुसार, जुलै महिन्यासाठी सामान्य पाऊस उपनगरात 855.7 मिमी आणि शहरात 734.1 मिमी असणे आवश्यक आहे, तरीही संपूर्ण महिना येणे बाकी आहे. येत्या चार दिवसांत अधूनमधून पाऊस पडण्याचे संकेत हवामान तज्ज्ञांनी दिले आहेत.

# शिवसेना मुस्लिमांविरोधात अजिबात नाही!

## » एकनाथ शिंदे यांचे प्रतिपादन; आम्ही मंदिरांबरोबरच मशिदीही वाचविल्या

। नाशिक ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पंतप्रधान शिवसेना मुस्लिमांविरोधात नसून आमच्या सरकारचा सर्वांना समान न्याय आहे. मुंबई-ठाण्यात आम्ही मंदिरांबरोबरच मशिदीही वाचविल्या, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रविवारी येथे केले.**

शिवसेना मुस्लिमांविरोधात नसून आमच्या सरकारचा सर्वांना समान न्याय आहे. मुंबई-ठाण्यात आम्ही मंदिरांबरोबरच मशिदीही वाचविल्या, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी रविवारी येथे केले. राज्यात महिनाभरात मुस्लीम महिलांच्या २८०० बचत गटांना मान्यता दिली जाणार असल्याची घोषणाही शिंदे यांनी केली.

शिवसेना (शिंदे गट) अल्पसंख्याक विभागाचा मेळावा षण्मुखानंद सभागृहात रविवारी आयोजित करण्यात आला होता. शिवसेना अल्पसंख्याक विभागाच्या अध्यक्षपदी सईद खान यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

या मेळाव्यात बोलताना शिंदे म्हणाले, सर्व धर्मांचा आदर करावा, अशीच शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांची भूमिका होती. त्यांचे विचार घेऊनच राज्य सरकार वाटचाल करीत आहे. शिवसेना मुस्लिमांविरोधात नसतानाही काही जण मतांच्या राजकारणासाठी गैरसमज निर्माण करीत आहेत.



अनेक मुस्लीम नेते बाळासाहेब ठाकरेंबरोबर होते, युती सरकारमध्ये साबीर शेख मंत्रीही झाले. अब्दुल सत्तार यांना आम्ही मंत्री केले आहे. मुस्लिमांनीही शिवसेनेला साथ दिली आहे. संभाजीनगरच्या जागेवर सत्तार यांच्यामुळे विधान परिषद निवडणुकीत मुस्लिमांची १२० मते मिळाली.

मी ठाण्यात सभागृह नेता असताना कब्रस्तानासाठी शासकीय जमीन मिळवून दिली. काँग्रेसने वर्षानुवर्षे केवळ आश्वासनेच दिली होती. हिंदू असो की मुस्लिम यांचे रक्त एकच असते. केंद्र व राज्य सरकार शेतकऱ्यांना प्रत्येकी वार्षिक सहा हजार रुपये म्हणजे एकूण बारा हजार रुपये देत आहे. दोन्ही सरकारच्या योजनांमध्ये हिंदू-मुस्लिम भेद नाही. सर्वांना लाभ मिळत आहे. मदरशांसाठी वार्षिक दोन लाख रुपये अनुदान, विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्त्या दिल्या जात आहेत, असे शिंदे यांनी नमूद केले.

### 'माझ्यामुळे अनेक जण घराबाहेर पडले'

» मला काहीही नशिबामुळे मिळाले नसून मी अतिशय मेहनत घेतो. नशिबाने एखादे वेळीच फळ मिळते, असा टोला शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांना उल्लेख न करता लगावला. माझ्यामुळे अनेकजण घराबाहेर पडले.

# अमरनाथ यात्रेकरू मार्गस्थ!

## जम्मू-काश्मीरमधील खराब हवामानामुळे स्थगित अमरनाथ यात्रा पुन्हा सुरू

### तळशिबिरांमधून यात्रेकरूंच्या तुकडीला रवाना होण्यास परवानगी



। श्रीनगर ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**जम्मू-काश्मीरमधील खराब हवामानामुळे स्थगित केलेली अमरनाथ यात्रा रविवारी तीन दिवसांनंतर पुन्हा सुरू करण्यात आली. पंजतरणी आणि शेषनाग तळशिबिरांमधून यात्रेकरूंच्या तुकडीला अमरनाथकडे रवाना होण्यास परवानगी देण्यात आल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली.**

अधिकाऱ्यांनी सांगितले, की अमरनाथ गुहा परिसरातील आकाश निरभ्र झाल्यानंतर गुहेचे दरवाजे उघडले आणि वाटेत अडकलेल्या भाविकांना शिविलग दर्शनाची परवानगी देण्यात आली. पंजतरणी तळशिबिरातील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने वृत्तसंस्थेस दूरध्वनीवरून सांगितले, की दर्शन घेतलेल्या यात्रेकरूंना बालताल तळशिबिराकडे परतण्याची परवानगी देण्यात आली आहे.

अनंतनाग जिल्ह्यात काझीगुंड येथे अडकलेल्या ७०० हून अधिक अमरनाथ यात्रेकरूंना लष्कराने आपल्या छावण्यांत आश्रय दिला आहे. काल प्रतिकूल हवामानामुळे आणि जम्मू-श्रीनगर राष्ट्रीय महामार्ग बंद झाल्याने यात्रेकरूंच्या कोणत्याही नव्या तुकडीला जम्मूहून पुढे जाण्याची परवानगी दिलेली नव्हती. दरड कोसळल्याने ठप्प महामार्गावरील वाहतूक पूर्ववत करण्याचे प्रयत्न सुरू आहे. रामबन जिल्ह्यात भूस्खलनामुळे रस्ता ४० मीटर खचला आहे. येथे तीन हजार ५०० हून अधिक वाहने अडकली आहेत. गुरुवारपासून जम्मू-काश्मीरच्या अनेक भागांत मुसळधार पाऊस कोसळत आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार या परिसरात सोमवारपासून हवामान सुधारण्याची शक्यता आहे.

पावसामुळेच जम्मू-श्रीनगर राष्ट्रीय महामार्गावरील दरडीचे ढिगारे हटवण्याच्या कामात अडथळे येत आहेत. युद्धपातळीवर हे काम सुरू आहे.

# देशात पावसाचा जोर वाढला, उत्तर भारतात १२ जणांचा मृत्यू!

## दिल्लीने मोडला 40 वर्षांचा रेकॉर्ड, हवामान खात्याने वर्तवलेल्या अंदाजानुसार रेड अलर्ट

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अमेरिकीदेशाचे भारतीय हवामान खात्याने वर्तवलेल्या अंदाजानुसार, दिल्ली, हरियाणा, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, राजस्थान, पंजाब आणि जम्मू-काश्मीरमध्ये मुसळधार ते अति मुसळधार पावसाची शक्यता आहे. उत्तर भारतात काल पावसाचा जोर वाढला होता. यामुळे दिल्लीतही मुसळधार पाऊस झाला.**



बिपरजॉय चक्रीवादळामुळे भारतात यंदा पाऊस काही काळ लांबला. जून महिन्याच्या अखेरीस पावसाने हजेरी लावली असली तरीही अवघ्या १५ दिवसांच्या आत पावसाने संपूर्ण देश व्यापला आहे. दरम्यान, उत्तर भारतात पावसाने जोर धरला असून तिथे मोठ्या प्रमाणात जीवित आणि वित्तहानी झाली आहे. गेल्या दोन दिवसांपासून उत्तर भारतात १२ जणांचा मृत्यू झाला असून येत्या काही दिवसांत मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. एनडीटीव्हीने यासंदर्भातील वृत्त दिले आहे.

भारतीय हवामान खात्याने वर्तवलेल्या अंदाजानुसार, दिल्ली, हरियाणा, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, राजस्थान, पंजाब आणि जम्मू-काश्मीरमध्ये मुसळधार ते अति मुसळधार पावसाची शक्यता आहे.

उत्तर भारतात काल पावसाचा जोर वाढला होता. यामुळे दिल्लीतही मुसळधार पाऊस झाला. मुसळधार पावसामुळे घराचे छत कोसळून एका ५८ वर्षीय महिलेचा मृत्यू झाला आहे. तर, राजस्थानमध्ये आतापर्यंत चार जणांनी आपले प्राण गमावले आहेत. उत्तर प्रदेशातील मुझफ्फरनगरमध्ये आज पहाटे मुसळधार पावसामुळे घर कोसळून एक महिला आणि तिच्या सहा वर्षांच्या मुलीचा मृत्यू झाला. हिमाचल प्रदेशातील शिमला येथे अशाच एका घटनेत एकाच कुटुंबातील तिघांचा मृत्यू झाला. तर, जम्मू-काश्मीरमध्ये काल पुंछ जिल्ह्यात अचानक आलेल्या पुरात दोन लष्करी जवानांचा मृत्यू झाला.

### दिल्लीत ऐतिहासिक पाऊस

**दिल्लीत अनेक भागात पाणी साचून वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. गेल्या २४ तासांत येथे १५३ मिमी पावसाची नोंद झाली असून १९८२ नंतर पहिल्यांदाच जुलैमध्ये एवढ्या पावसाची नोंद करण्यात आली आहे. दिल्ली आणि आसपासच्या भागात आजही मुसळधार पाऊस कोसळत असून गुरुग्रामच्या अनेक भागांमध्ये पाणी साचलं आहे. तसंच, वीजपुरवठाही खंडित करण्यात आला आहे.**

### नऊ जिल्ह्यांना अतिवृष्टीचा इशारा

**भारतीय हवामान विभागाने राजस्थानातील नऊपेक्षा जास्त जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टीचा अंदाज वर्तवला आहे. राजसमंद, जालोर, पाली, अजमेर, अलवर, बांसवाडा, भरतपूर, भिलवाडा, बुंदी, चित्तोडगड, दौसा, धौलपूर, जयपूर आणि कोटा येथे अतिवृष्टी होण्याची शक्यता आहे.**



# समंथानं दिली गूडन्यूज

समंथा रुथ प्रभू ही दक्षिणेतील टॉप अभिनेत्रींपैकी एक आहे. तिची लोकप्रियता ही केवळ दाक्षिणेतच नव्हे तर भारतभर पसरली आहे. संमथा मागील काही दिवसांपासून तिच्या शांकूतला या चित्रपटामुळं चर्चेत आहे मात्र त्याबरोबरच तिला झालेल्या आजारामुळेही तिचा चर्चा होत असते. यापूर्वी, सामंथा रुथ प्रभूने तिच्या चाहत्यांना सांगितले होते की ती मायोसिटिस नावाच्या आजाराने ग्रस्त आहे.मात्र आता समंथा तिच्या सामान्य जीवनात परत येत दिसत आहे. समंथाने आज तिचा एक फोटो शेअर केला आहे, ज्यामध्ये तिचा चेहरा चमकत आहेहा समांथाचा सन किस केलेला फोटो आहे. आपल्या आवडत्या समंथाचा फोटो पाहिल्यानंतर चाहत्यांना खुप आंनद झाला आहे. सामंथा अशा प्रकारे आनंदी आणि फिट असल्याचे पाहून चाहत्यांनी तिला खुप शुभेच्छा दिल्या आहेत.

समंथाची ही पोस्ट पाहिल्यानंतर ती हळूहळू आजारातून बरी होत असल्याचा अंदाज लावला जाऊ शकतो. समांथाने तिच्या अधिकृत इंस्टाग्राम अकाउंटवरून एक फोटो शेअर केला आहे. यामध्ये तिचे डोळे मिटलेले असून चेहऱ्यावर हलके हसू पसरले आहे. या फोटोसोबत सामंथाने लिहिले कॅप्शनमध्ये लिहिले आहे की, 'प्रकाशाचा शोध संपलासमांथाच्या या फोटोवर चाहत्यांनी कमेंटचा पाऊसच पाडला आहेत. कमेंट बॉक्समध्येही चक्क संमथाला अनेक लग्नाचे प्रस्ताव येत आहेत. एका यूजरने लिहिलयं की, 'प्रकाश तुझ्यातच आहे. तू चमकणारा तारा आहेस. तर दुसऱ्या यूजरने लिहिले की, 'आम्ही तुझ्या अशा पोस्ट खूप मिस करायचो. अखेर, 2023ने तुझ्या चेहऱ्यावर हासू तर आणलं. एकाने लिहिले की, 'सूर्य चंद्रावर प्रेम करत आहे.', 'तुला प्रकाशाची गरज नाही, तू स्वतः रोशनी आहेस.' यापूर्वी समंथाला तिच्या लूकसाठी सोशल मीडियावर खूप ट्रोल करण्यात आले होते. यावर समंथा म्हणाली होती की, 'मी प्रार्थना करते की, तुम्हाला माझ्यासारख्या आजारांचा आणि औषधांचा सामना करावा लागू नये. आणि तुमच्या ग्लोसाठी माझ्याकडून थोडं प्रेम. सामंथाशिवाय वरुण धवननेही ट्रोल्सना चोख प्रत्युत्तर दिले.

# गौतमी पाटील सेम टू सेम आईची कॉपी!

आपल्या दिलखेचक नृत्यशैलीमुळे प्रचंड लोकप्रियता मिळवणारी गौतमी पाटील ही कायमच चर्चेत असते. दर काही दिवसांनी या ना त्या कारणाने गौतमी पाटीलविषयी सतत चर्चा सुरु असते. आतादेखील आणखी एका कारणामुळे सोशल मीडियावर गौतमी पाटीलच्या नावाची चर्चा सुरु झाली आहे. गौतमीच्या चाहत्यांना तिच्या प्रत्येक गोष्टीविषयी उत्सुकता आहे. त्यामुळेच सध्या इन्स्टाग्रामवर गौतमी पाटीलच्या बालपणीचा एक फोटो व्हायरल होत आहे. या फोटोतील गौतमीसोबत असणारी व्यक्ती दुसरी-तिसरी कोणी नसून तिची आई आहे. @OFFICIAL_GAUTAMI941 या इन्स्टाग्राम अकाऊंटवरुन शेअर करण्यात आलेला फोटो गौतमीच्या आईचा आहे की नाही, याबाबत खात्री नाही. परंतु, गौतमीचे अनेक चाहते हे इन्स्टाग्राम अकाऊंट फॉलो करतात. या अकाऊंटवरुन शेअर करण्यात आलेल्या फोटोला "माझं जग, मी आणि माझी आई", असे कॅप्शन देण्यात आलेले आहे. या फोटोवर गौतमी पाटीलच्या चाहत्यांकडून प्रतिक्रियांचा पाऊस पडत आहे. गौतमी आपल्या आईची हुबेहूब कॉपी दिसत असल्याचे अनेकांनी म्हटले आहे. त्यामुळे सध्या हा फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.



# सपना चौधरी वादाच्या भोवऱ्यात

हरियाणाची प्रसिद्ध डान्सर आणि 'बिग बॉस ११' फेम सपना चौधरी तिच्या खासगी आयुष्यामुळे चर्चेत असते. पण आता ती वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. सपनाच्या भावाच्या पत्नीने तिच्या कुटुंबियांच्या विरोधात तक्रार दाखल केली आहे. सपना, तिचा भाऊ कर्ण आणि आई नीलम यांच्याविरुद्ध पलवलच्या महिला पोलिस ठाण्यात हुंड्यासाठी मारहाणीसह गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी पोलिस तपास सुरू असून अद्याप कोणालाही अटक झालेली नाही. सपना चौधरीच्या भावावर त्याच्या पत्नीने अनैसर्गिक लैंगिक शोषणासारखे गंभीर आरोप केले आहेत. पलवल येथील रहिवासी असलेल्या सपनाच्या वहिनीने महिला पोलीस ठाण्यात तक्रार दिली. तिने तक्रारीत म्हटले आहे की, २०१८ साली दिल्लीतील नजफगढ येथील रहिवासी सपना चौधरीचा भाऊ कर्ण याच्याशी तिचे लग्न झाले होते. लग्न झाल्यापासून तिचा हुंड्यासाठी छळ केला जात होता आणि तिला अनेकदा मारहाणही केली जात होती, पण मुलगी झाल्यानंतर सासरच्यांनी मुलीसाठी झालेल्या कार्यक्रमात क्रेटा कारची मागणी केली. तिच्या वडिलांनी ३ लाख रुपये रोख आणि सोने-चांदी, कपडे दिले, मात्र तरीही तिच्या सासरच्यांनी हुंड्याची मागणी पूर्ण न केल्याने क्रेटा कार आणण्यासाठी तिचा छळ सुरू केला. सपनाच्या वहिनीने असाही आरोप केला आहे की २६ मे २०२० रोजी तिच्या पतीने दारूच्या नशेत तिच्यावर अत्याचार केला आणि अनैसर्गिक लैंगिक संबंध ठेवले. दरम्यान ६ महिन्यांपूर्वी ती तिच्या माहेरी पलवल येथे आली आहे. या प्रकरणी आतापर्यंत एकाही आरोपीला अटक करण्यात आलेली नाही. या प्रकरणाचा तपास करत आहेत. आरोप निश्चित झाल्यानंतरच आरोपींना अटक करण्यात येईल असं पोलिसांचं म्हणणं आहे.

दरम्यान सपना चौधरी ही हरियाणाची प्रसिद्ध डान्सर आहे. तिचे स्टेज शो पाहण्यासाठी लाखो लोक गर्दी करतात. ती 'बिग बॉस ११'मध्ये दिसली होती, जिथे तिने तिच्या आयुष्यातील अनेक गुपितं उघड केली होती. वडिलांच्या निधनानंतर तिने घराची जबाबदारी सांभाळली आणि ती डान्स स्टेज शो करू लागली. सपनाने असेही सांगितले होते की, तिने एकदा आत्महत्येचा प्रयत्नही केला होता. सपनाचा बिग बॉस ११ मधील प्रवास फार मोठा नसला तरी तिने प्रेक्षकांची मने जिंकली. यानंतर ती काही बॉलिवूड चित्रपटांमध्ये आयटम साँग करताना दिसली होती.



# तिनं माझ्या कानशिलात लगावली, कारण...अभिषेकनं सांगितला तो धक्कादायक प्रसंग

मुंबई: बॉलिवूडचे शेहेनशाह अमिताभ बच्चन यांचा मलगा अभिषेक बच्चन याचं फिल्मी करिअर इतर स्टारकिड्सपेक्षा उशीरानं सुरू झालं. अमिताभ यांचा लेक असल्यानं त्याची नेहमीच तुलना झाली. त्याच्या कामाचं कौतुक होण्यापेक्षा त्याच्या चुकांची चर्चा जास्त झाली. अभिनेकला सुरुवातीली बरीच टीका सहन करावी लागली. 'गुरु', 'युवा', 'कभी अलविदा ना कहना' आणि 'मनमर्जियां' यांसारख्या चित्रपटातील अभिनयासाठी त्याचं कौतुकही झालं. पण हे कौतुक ऐकण्यासाठी बऱ्याचदा टीकांना सामोरं जावं लागलं आहे. वडील बॉलिवूडचे शेहेनशाह असूनही त्याच्या वाट्याला अपेक्षेइतकं यश आलं नाही. २००२मध्ये अभिनेषकचा 'शरारत' नावाचा सिनेमा प्रदर्शित झाला होता. ई टाइम्सला दिलेल्या मुलाखतीत अभिषेकनं त्याच्यासोबत घडलेला एक विचित्र असा प्रसंग सांगितला. हा सिनेमा प्रदर्शित झाल्यानंतर महिला प्रेक्षकानं एका थिएटरच्या बाहेर अभिषेकच्या कानशिलात लगावली होती. त्या महिलेला सिनेमा आवडला नव्हता. त्यामुळं तिनं थेट अभिषेकला पाहिल्यानंतर त्याला थप्पड लगावली होती. इतकंच नाही तर, त्या महिलेनं अभिषेकला तू अभिनय करणं सोडून दे, असंही म्हटलं होतं.

# भारतात वर्ल्ड कप 2023:
# भारताला ब्लॅकमेल करतेय पाकिस्तान!

## » पाकिस्तानला नेमकं काय करावं कळेना!

नवी दिल्ली ।
नवी दिल्ली। वृत्तसंस्था

**ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये भारतात होणाऱ्या क्रिकेट विश्वचषकाबाबत पाकिस्तान सरकार कोणत्याही निष्कर्षापर्यंत पोहोचू शकलेले नाही. त्यांच्या क्रीडामंत्र्यांनी मात्र आता वेगळाच सूर लावला आहे.**

: एकदिवसीय विश्वचषक २०२३ यंदा ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये भारतात खेळवला जाणार आहे. या विश्वचषकाच्या तारखाही जाहीर झाल्या आहेत. सर्व संघांनी तयारीला अंतिम टच देण्यास सुरुवात केली आहे. यजमान भारत वर्ल्डकपसाठी चोख व्यस्था करण्यात व्यस्त आहे. पण एक पाकिस्तान आहे, ज्यांची नाटके काही थांबण्याचे नाव घेत नाही. पाकिस्तानचा संघाचा वर्ल्डकप खळण्याचा निर्णय अजूनही तळ्यात मळ्यात आहे. कोणी एक बोलतो तर कोणी दुसरंच बोलतो. कधी पाकिस्तानचे माजी क्रिकेटपटू अपशब्द वापरतात तर कधी बोर्डाचे अधिकारी टोमणे मारायला लागतात. आता तर पाकिस्तानचं आजू एक नवं नाटक सुरु झालं आहे.

यावेळी पाकिस्तानचे क्रीडा मंत्री अहसान मजारी यांनी म्हटले आहे की, जर भारत आशिया चषक खेळण्यासाठी पाकिस्तानमध्ये गेला नाही तर त्यांचा देशही वर्ल्ड कपमधून माघार घेईल. पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी विश्वचषकात पाकिस्तानच्या भारत दौऱ्याबाबत एक समिती स्थापन केली आहे. ४१ वर्षीय क्रीडा मंत्री मजारी हे त्याचाच एक भाग आहेत. मजारी यांच्या म्हणण्यानुसार, जर भारताने आशिया चषकादरम्यान पाकिस्तानमध्ये खेळण्याऐवजी आपले सामने तटस्थ मैदानावर ठेवण्याची मागणी केली, तर आम्ही भारतात होणाऱ्या विश्वचषकादरम्यान आमचे सामने तटस्थ ठिकाणी खेळू.

इंडियन एक्स्प्रेसशी



बोलताना एहसान-उर-रहमान-मझारी म्हणाले, 'पाकिस्तान क्रिकेट बोर्ड माझ्या मंत्रालयाच्या अखत्यारीत येते आणि हे माझे वैयक्तिक मत आहे की जर भारत आशिया चषकादरम्यान मागणी करत असेल, तर पाकिस्तानने विश्वचषकादरम्यानही तटस्थ ठिकाणी खेळण्याची मागणी केली पाहिजे. पाकिस्तान सरकारने स्थापन केलेल्या या समितीचे अध्यक्ष परराष्ट्र मंत्री बिलावल भुट्टो झरदारी आणि त्यात ११ मंत्र्यांचाही समावेश आहे. ही समिती आपला अहवाल पंतप्रधानांना सादर करणार असून अंतिम निर्णय त्यांना घ्यायचा आहे. याचसोबत पाकिस्तानचा संघ एका सुरक्षा पथक भारतात पाठवणार आहे. जिथे जिथे पाकिस्तानचे सामने होणार आहेत तिथे हे सुरक्षेच्या दृष्टीने हे पथक पाहणी करेल. पाकिस्तानचा संघ वर्ल्डकपमध्ये अहमदाबाद, चेन्नई, बंगळुरू, कोलकाता आणि हैदराबाद या ठिकाणी खेळणार आहे.



### विराट कोहली भलताच इम्प्रेस

»टी-२० विश्वचषक २०२२ मधील भारत-पाकिस्तानचा पहिला सामना प्रचंड रंजक ठरला. या सामन्यात भारताने पाकिस्तानवर विजय मिळवला आणि या विजयाचा शिल्पकार ठरला विराट कोहली.जगातील सर्वोत्तम फलंदाजांमध्ये नाव असणाऱ्या कोहलीने या सामन्यातही आपल्या खेळाची जादू दाखवली. यानंतर पुढील सामन्याच्या नेट प्रॅक्टिस दरम्यान विराटला एका पाकिस्तानी नेट बॉलरच्या खेळाने भुरळ पाडली. पाकिस्तानी नेट बॉलर मोहम्मद इरफानच्या नेट बॉलिंगने विराट कोहली चांगलाच इम्प्रेस झाला आहे. विराटने केलेलं हे कौतुक आपल्यासाठी फार मोठी आनंदाची गोष्ट असल्याचं हा नेट बॉलर सांगतो.

---

# विम्बल्डन टेनिस स्पर्धा : पेगुला, रुब्लेव्ह उपांत्यपूर्व फेरीत!

## » वोंड्रोउसोवा, रायबाकिनाची आगेकूच; पुरुषांत रुन, सिन्नेरचे विजय

। विम्बल्डन ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**अजित अमेरिकेच्या चौथ्या मानांकित जेसिका पेगुला आणि चेक प्रजासत्ताकच्या मार्केटा वोंड्रोउसोवा यांनी आपापल्या सामन्यात विजय मिळवत विम्बल्डन ग्रँडस्लॅम टेनिस स्पर्धेत महिला एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. पुरुषांत सातव्या मानांकित आंद्रे रुब्लेव्ह, इटलीचा आठवा मानांकित यानिक सेन्नेर यांची उपांत्यपूर्व फेरीत आगेकूच केली. डेन्मार्कचा होल्गर रुन, आणि बुल्गारियाचा ग्रिगोर दिमोत्रोव्ह यांनीही विजय नोंदवले..**

महिला एकेरीच्या उपउपांत्यपूर्व सामन्यात पेगुलाने युक्रेनच्या लेसिया सुरेन्कोवर ६-१, ६-३ असा सरळ सेटमध्ये विजय मिळवला. सामन्याच्या सुरुवातीपासून आक्रमक खेळ करणाऱ्या पेगुलाने सुरेन्कोला पुनरागमन करण्याची कोणतीच संधी दिली नाही. याच फेरीतील अन्य सामन्यात वोंड्रोउसोवाने आपल्याच देशाच्या मेरी बोझकोव्हाला २-६, ६-४, ६-३ असे पराभूत केले. सामन्यातील पहिला सेट गमावल्यानंतर वोंड्रोउसोवाने दुसऱ्या सेटमध्ये जोरदार पुनरागमन करताना सामना बरोबरीत आणला. तिसऱ्या सेटमध्येही तिने आपली हीच लय कायम राखत विजय नोंदवला. तिसऱ्या फेरीतील सामन्यात कझाकस्तानच्या एलिना रायबाकिनाने ब्रिटनच्या कॅटी बाऊल्टरचा ६-१, ६-१ असा पराभव केला. तर, बिगरमानांकित मिरा अँड्रीवाने अनास्तासिया पोटापोव्हाला ६-२, ७-५ असे नमवले.

पुरुष एकेरीच्या उपउपांत्यपूर्व सामन्यात रुब्लेव्हने कझाकस्तानच्या अ‍ॅलेक्झांडर बुबलिकला चुरशीच्या लढतीत ७-५, ६-३, ६-७ (६-८), ६-७ (५-७), ६-४ असे पराभूत केले. तर, सिन्नेरने कोलंबियाच्या डॅनिएल एलाही गलानला ७-६ (७-४), ६-४, ६-३ असे नमवले. अन्य सामन्यात, रुनने स्पेनच्या अलेहांद्रो डाविडोविच फोकिनावर पाच सेटपर्यंत रंगलेल्या लढतीत ६-३, ४-६, ३-६, ६-४, ७-६ (१०-८) असा विजय मिळवला. तर, दिमित्रोव्हने अमेरिकेच्या दहाव्या मानांकित फ्रान्सिस टियाफोला ६-२, ६-३,६-२ असे पराभूत करत चौथी फेरी गाठली.

